# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १३/१०/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील मौजा अदासा शेतशिवार येथे दिनांक ११/१०/२०२२ चे ०७.३० वा. ते दिनांक १२/१०/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान **सुनिल रमेश सेलोकर(मृतक) वय ४५ वर्षे रा. अदासा ता.मौदा जि.नागपूर** हा शेतात कामाने गेला सायंकाळी घरी परत आला नाही. दिनांक १२/१०/२०२२ रोजी त्याचा चुलत भाऊ नामे राहुल बंडुजी सेलोकर रा. अदासा ता.मौदा यांनी सकाळी ०८.०० वा. दरम्यान त्याचा शोध घेण्याकरीता त्याच्या शेताकडे आले असता त्यांना मृतकाचे चपला सुनिल बन्सोड रा.वरठी जि.भंडारा यांचे मौजा अदासा येथे असलेल्या शेतात दिसले. त्या ठिकाणी ते हजर असता त्यांना युवराज चरडे रा.शिवनी यांनी फोन करून सांगितले की, 'तुझा चुलत भाऊ सुनिल सेलोकर हा खात ते पांजरा जवळील नहराच्या पाण्यामध्ये मृत अवस्थेत पडलेला आहे' तेंव्हा त्या ठिकाणी फिर्यादी हा लगेच गेला असता लोकांची गर्दी दिसली व चुलत भाऊ सुनिल सेलोकरचे प्रेत नहरामध्ये पाण्यात दिसुन आले. मृतकास बाहेर काढले असता त्याच्या छातीवर, उजव्या हातावर, डाव्या हातावर भाजल्या सारखा दिसल्याने फिर्यादीस वाटले की, सदर जखमा या मृतकास करंट लागल्यामुळे होऊ शकतात करीता फिर्यादीने पो.स्टे. मौदा येथे तोंडी रिपोर्ट दिल्याने मर्ग क्र. ५५/२०२२ कलम १७४ जा.फौ. अन्वये नोंद असुन चौकशीत आहे. सदर मर्गचे कागदपत्रे प्राप्त झाल्याने पो. स्टे. अरोली येथे मर्ग क्र.२०/२०२२ कलम १७४ जा.फौ. अन्वये दाखल असुन तपासात आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल बंडुजी सेलोकर, वय ३१ वर्ष, रा. अदासा यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार टीकाराम जाधव मो.नं.८८३०९६५३४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर